गुरुवार दि.१७ ऑक्टोबर २०२४
किंमत २ रुपये | महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०२ अंक : ४३
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | epaper.lokneta.in

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

# मी स्वत:मराठा समाजाला आरक्षण देणार:मराठा आरक्षणावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची स्पष्टोक्ती



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

राज्यातील मराठा आरक्षणाच्या प्रश्नावरुन मनोज जरांगे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यांच्या भूमिकेवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली असून मराठा समाजाला आम्ही अन् मी स्वत: आरक्षण देणार आहे. ओबीसींच्या आरक्षणाला धक्का न लावता हे आरक्षण देणार, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले आहे. महायुतीच्या वतीने बुधवारी संयुक्त पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी ते बोलत होते.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, आम्ही जे बोलतो ते करतो. मी स्वत: ओबीसीच्या आरक्षणाला धक्का न लागता मराठा समाजाला आरक्षण देणार आहे. दसरा मेळाव्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला वंदन करुन मराठा समाजाला आरक्षण देण्याची शपथ घेतली. त्यानंतर विधानसभेचे अधिवेशन बोलावून मराठा समाजाला आरक्षण देण्यात आले होते. यापूर्वीही देवेंद्र फडणवीस यांनी देखील आरक्षण दिले होते, पण ते आरक्षण कुणी घालवले, त्यांना आरक्षण कोर्टात टिकवता आले नाही. आता देखील आम्ही दिलेले आरक्षण रद्द करण्यासाठी याचिका दाखल होत आहेत. याचिका दाखल करणारे कोण आहेत, ते एकदा पहा, असे म्हणत एकनाथ शिंदे यांनी विरोधकांवरही निशाणा साधला.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, मनोज जरांगे पाटील हे मराठा समाजाला न्याय देण्यासाठी रस्त्यावर उतरले आहेत. पण महायुतीने मराठा समाजाला काय दिले, याबाबतही जरांगे यांनी विचार करावा. महायुतीने सारथी, अण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळ तसेच ओबीसी समाजाप्रमाणे मराठ्यांना सवलती दिल्या आहेत. आधी ज्यांच्या हातात सत्ता होती, त्यांनी कधीही मराठा समाजाला आरक्षण दिले नाही. फक्त मतांसाठी मराठा समाजाचा वापर केला, त्यामुळे मराठा समाजाला कोणी दिले आणि कोणी वंचित ठेवले, याचा जरांगे यांनी विचार करावा, असेही शिंदे म्हणाले.महाराष्ट्रात लाडकी बहीण योजनला प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे. सर्व लाडक्या बहीणी सरकारच्या पाठिशी आहेत. ही योजना गेम चेंजर झाली आहे. परंतु विरोधक ही योजना बंद करण्यासाठी कोर्टात गेले आहेत. महाविकास आघाडी आमच्या सर्व योजना बंद करण्याची भाषा करीत आहे. परंतु, लाडकी बहीण योजनेला हात लावला तर याद राखात्यांचा करेक्ट कार्यक्रम होईल. आमच्या लाडक्या बहिणी त्यांचा करेक्ट कार्यक्रम करणार आहे, अशी टीका एकनाथ शिंदे यांनी विरोधकांवर केली आहे.दरम्यान, मराठ्यांना फक्त शिंदे साहेब आरक्षण देऊ शकतात. मराठ्यांना आरक्षण देणारा तेवढाच धाडसी माणूस आहे, असे मनोज जरांगे यांनी म्हटले आहे. महायुतीच्या पत्रकार परिषदेनंतर मनोज जरांगे यांनी जालन्यात पत्रकार परिषद घेत हे विधान केले आहे.

## गो.सी.गावंडे महाविद्यालयात वर्ल्डमिसाईल मॅन डॉ.एपीजे अब्दुल कलाम यांची जयंती

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड | सय्यदरहीम रजा**



उमरखेड येथील गोपिकाबाई सीताराम गावंडे महाविद्यालयात १५ ऑक्टोबर रोजी भारताचे माजी राष्ट्रपती, वर्ल्डमिसाईल मॅन डॉ. एपीजे अब्दुल कलाम (Dr a.P.J. abdul Kalam) यांची जयंती निमित्ताने वर्ल्ड स्टूडेंट्स डे (World Student's Day) साजरा केला जातो, त्यानिमित्ताने राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी व वनस्पती शास्त्र विभागाच्या अंतिम वर्गाच्या विद्यार्थ्यांनी त्यांना शब्दसुमनाने श्रद्धांजली अर्पित केली व प्रतिमा पूजन करण्यात आले.प्रामुख्याने कुमारी कांचन जाधव, किरण उपेवाडी, रुपेश खिल्लारे व इतर पदवी व पदव्युत्तर विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यार्थी हे देशाचे भविष्य आहेत. त्यांच्या प्रगतीवर देशाच्या विकासाचे भवितव्य अवलंबून आहे. त्यामुळे त्यांना समर्पित असा एक दिवस असायला हवा. म्हणूनच अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त विद्यार्थी दिवस साजरा करण्यात येतो. विद्यार्थ्यांना महत्त्व देणे आणि त्यांचे समाजातील महत्त्व जाणणे हे या दिवसाचे उद्दिष्ट आहे.या दिवशी डॉ. एपीजे अब्दुल कलाम आणि त्यांच्या जीवनातील प्रेरणादायी कथा विद्यार्थ्यांना सांगून प्रेरित केले जाते.कलाम यांच्या आयुष्यातील बरेच काही शिकण्यासारखे आहे. त्यामुळेच या दिवसानिमित्त ते शिकण्याची संधी विद्यार्थ्यांनी दवडू नये. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रशांत अनासाने यांनी डॉ. एपीजे अब्दुल कलाम आणि त्यांच्या जीवनातील प्रेरणादायी कथा विद्यार्थ्यांना सांगून प्रेरित केले.कार्यक्रमासाठी इनरव्हील क्लबच्या सचिव डॉ वसुंधरा शिंदे, शीतल कांबळे व राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी उपस्थित होते.

## डॉ.कलाम यांचे व्यक्तीमत्व विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी–प्रा.डॉ.गंगाखेडकर यांचे मत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उस्मानगर | गणेश लोखंडे**



सामान्य परिस्थितीतून राष्ट्रपती पदापर्यंतचा डॉ अब्दूल कलाम यांचा प्रवास सर्व विद्यार्थी व युवकांना प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन प्रतिभा निकेतन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.किशोर गंगाखेडकर यांनी केले. प्रतिभा निकेतन महाविद्यालय नांदेड,येथे ग्रंथालय विभागाच्या वतीने दि.१५ ऑक्टोबर रोजी डॉ. ए पी जे .अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन आयोजित कार्यक्रमाच्या वेळी ते बोलत होते. वाचनाद्वारे बुद्धिमत्ता वाढते व सर्वांगीण विकास साधता येतो, म्हणुन प्रत्येकाने वाचले पाहिजे. असे प्राचार्य डॉ .गंगाखेडकर म्हणाले. ग्रंथपाल डॉ.रविंद्र लाठकर यांनी यावेळी वाचन प्रेरणा दिवस कार्यक्रम आयोजनामागची भुमीका मांडली. विद्यार्थ्यांनी वाचनाकडे प्रेरीत व्हावे यासाठी विवीध स्पर्धांमधील यशस्वी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची पूस्तके महाविद्यालयादवारे भेट देण्यात आली. डॉ ए पी जे अब्दूल कलाम यांच्या विवीध ग्रंथांमध्ये व्यक्त झालेले विचार, कोटेशन्स यावर आधारीत भित्तीपत्रकाचे विमोचन मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. यावेळी एन. एस. एस प्रमुख डॉ जे यु देशमुख, डॉ एस व्ही तांडे, डॉ निळकंठ पाटील, डॉ डी. एस वाघमारे, डॉ आर. डी. वरवंटीकर, डॉ एम बी लूटे,डॉ मालवीया, डॉ हापगुंडे, प्रा. यशवंतकर, प्रा. विलास घोंगडे, प्रा एन एस गायकवाड व इतर कर्मचारी , सह विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उन्मेष चालीकवार, अशोक काळे, अजय पवार, माधव घोरबांड यांनी परिश्रम केले.

## बिलोली महावितरण कार्यालयात प्रधान लाईनण माथेफिरु टिप्परसेचा मनमाणी कारोभार


### विज ग्राहकांना अरे रावी ची भाषा करणारे प्रधाण लाईनमण टिप्परसेला निलंबित करा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली | गौतम गावंडे**




बिलोली तालुक्यातील महावितरण कार्यालयात सध्या मोठ्या प्रमाणावर सावळागोंधळ सुरू आहे. कार्यालयात प्रभारी राज असुन ग्राहकांच्या समस्या कडे लक्ष देणे आवश्यक आहे .ग्राहकांचे फोन न घेणे, बील दुरूस्ती अर्ज करूनही बील लवकर दुरूस्त न होणे , बिलोली तालुक्यात अनेक ठिकाणी तारा लोंबकळत आहे या कडे महावितरण कडून दुर्लक्ष केले जात आहे. बिलोली शहरातील आनावश्क विद्युत पोल,अव्वाच्या सव्वा बीज बील आकारणी,वारंवार बत्ती गुल होणे असे प्रकार बिलोली तालुक्यात सर्रास सुरू आहे. यामुळे ग्राहकांना नाहक मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. बिलोली शहरासह तालुक्यात जादा बील आकारणी मीटर नादुरुस्त होत नाही , नवीन मिटर कनेक्शन मिळत नाही अशी धमकी माथेफिरु प्रधान लाईनमण टिप्परसे विज ग्राहकांना देत आहेत अशा मोठ्या प्रमाणावर तक्रारी आहेत. यासाठी ग्राहकांना वारंवार महावितरण कार्यालयात चकरा माराव्या लागतात पण अधिकारी भेटतच नाहीत. कासराळीला जा , दुपारी येतील असे सांगितले जाते अधिकारी फोनही उचलत नाहीत. ग्राहक चकरा मारून हैराण होत आहेत. शहरात युनिट कार्यालयात प्रभारी सहाय्यक अभियंता हे प्रभारी असल्याने कोणत्याही कामासाठी शहरातील नागरिकांना ७ किलोमीटर वर असलेल्या कासराळी येथील महावितरण कार्यालयात चकरा माराव्या लागत आहे. शहरातील युनिट कार्यालय मात्र दोन किलोमीटर गावाच्या बाहेर आहे . बिलोली साठी कायमस्वरूपी सहायक विद्युत अभियंता रिक्त पद भरण्यात यावी तसेच माथेफिरु प्रधान लाईनमण टिप्परसेला निलंबित करण्यात यावे अशी मागणी बिलोली तालुक्यातील विज ग्राहक करीत आहेत.



पेठवडज येथील श्री.बालाजी संस्थान मंदिर कमिटी कडून अशोक डावकोरे साहेब व त्यांच्या सुविद्य पत्नी यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

**झाडे लावा झाडे जगवा**



**चारोळी**

निसर्गाच्या सहवासात
कधीतरी हरवूनी जावे
दुःख वेदना विसरूनी
गीत ओठावरी यावे.

रंजना सानप
मायणी (सातारा)

## अस्थिरोग तज्ञ डॉक्टर नितीन पाईकराव यांना पितृशोक

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड | प्रतिनिधी**



नांदेड येथील हर्ष नगर भागातील ज्येष्ठ नागरिक लक्ष्मण विठ्ठलराव पाईकराव वय वर्ष ७२ यांचे आज सकाळी वर्धा निधन झाले आहे हादगाव तालुक्यातील धानोरा येथील रुई येथील ते मोर रहिवासी होते दिवंगत लक्ष्मणराव पाईकराव यांच्या पत्त्यात पत्नी मायावती पाईकराव तीन मुले एक मुलगी नातू असा मोठा परिवार आहे. नांदेड येथील सुप्रसिद्ध अस्थिरोग तज्ञ डेल्टा हॉस्पिटलचे संचालक डॉ. नितीन पाईकराव अमरावतीच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्रा. डॉ. प्रशांत पाईकराव प्रा. राहुल पाईकराव आणि बालरोग तज्ञ डॉ. प्रज्ञा पाईकराव बनसोडे यांचे ते वडील होत दिनांक १६ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता डेल्टा हॉस्पिटल नांदेड येथील निवासी स्थानापासून त्यांच्या अंत्ययात्रेला सुरुवात होणार असून हर्षनगर येथील बुद्ध विहार मार्गे गोवर्धन घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले आहे

## नवज्योत दुर्गा उत्सव मंडळाचे वतीने शांततेत विसर्जन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार | विनायक कुटे**

लोणार शहरात ठिकठिकाणी मंगळवार सकाळ पासुन ठिकठिकाणी श्री दुर्गा देवीच्या मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. ढोल ताशांच्या गजरात तसेच फटाक्यांच्या आतिषबाजीत विसर्जन मिरवणुका काढण्यात आल्या होत्या.नवरात्रोत्सवातील नऊ दिवसांमध्ये श्री दुर्गा देवीच्या विविध रूपांची पूजा पारंपरिक पद्धतीने केली जाते. प्रत्येक ठिकाणी परंपरेप्रमाणे यात बदल दिसून येतो. नवरात्रोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केल्यानंतर दुर्गा देवीच्या मूर्तीचे विसर्जन करुन या उत्सवाची सांगता करण्यात येते.लोणार शहरात विविध मंडळांनी श्री दुर्गा देवीची विधिवत प्रतिष्ठापना केली होती. तर काही ठिकाणी देवीची घटस्थापना करता दांडियाचे आयोजन करण्यात आले होते. नवज्योत दुर्गा उत्सव मंडळ रामनगर लोणार येथे भुल भुलया भुताची गुफा विशेष आकर्षण होते दरवर्षीप्रमाणे पारंपरिक पद्धतीने नवरात्रोत्सव साजरा केला गेला लोणार शहरात नवरात्रोत्सवाची धूम गेले नऊ दिवस सुरु होती. विविध धार्मिक तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन यानिमित्त करण्यात आले होते. श्री दुर्गा देवीच्या मूर्तीच्या विसर्जनानंतर या उत्सवाची सांगता झाली. विसर्जन मिरवणुकीलाही मोठ्या प्रमाणात गर्दी होती. पोलीस बंदोबस्तही ठेवण्यात आला होता. नगर पालिका सर्वजनिक मूर्ती विसर्जन स्थळी मूर्तीचे शांतपणे विसर्जन करण्यात आले.



# निवडणुकीच्या अनुषंगाने विविध बाबींवर निर्बंध आचारसंहितेत काय करावे काय न करावे जाणून घ्या

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

नांदेड जिल्ह्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ व १६ नांदेड लोकसभा पोटनिवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने भारतीय नागरीक संरक्षण संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये जिल्हादंडाधिकारी अभिजीत राऊत यांनी निवडणुकीच्या कालावधीमध्ये जिल्हाधिकारी कार्यालय, सर्व उपविभागीय अधिकारी कार्यालये, सर्व तहसिल कार्यालये आणि सर्व शासकीय कार्यालये व विश्रामगृहे या ठिकाणी पुढील बाबी करण्यास विविध आदेशान्वये बंदी घातली आहे.

**विश्रामगृहावर बैठका बंद**

कोणत्याही प्रकारची मिरवणूक/मोर्चा काढणे, सभा घेणे, उपोषण करणे, सत्याग्रह करणे. कोणत्याही प्रकारच्या घोषणा देणे, वाद्य वाजविणे किंवा गाणी म्हणने, इत्यादी. कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करण्यावर बंदी आहे.

**लाऊडडस्पिकर परवानगीशिवाय नाही**

कोणतीही व्यक्ती, संस्था पक्ष कार्यकर्ते यांना ध्वनीक्षेपकाचा (लाऊडस्पिकरचा) वापर सक्षम पोलीस अधिका-यांच्या पुर्व परवानगीशीवाय करता येणार नाही. फिरते वाहन रस्त्यावरुन धावत असतांना त्यावरील ध्वनिक्षेपकाचा वापर करता येणार नाही. निवडणूक कालावधीत लाऊडस्पिकरचा वापर सकाळी ६ वाजेपुर्वी व रात्री १० वाजेनंतर करता येणार नाही.

**ताफ्यात फक्त गाड्या**

कोणत्याही वाहनांच्या ताफ्यामध्ये तीन पेक्षा जास्त मोटारगाडया अथवा वाहने (उरीी/तशहळलश्रशी) वापरण्यास या आदेशाद्वारे निर्बंध घालण्यात आले आहे.

**पक्ष कार्यालये नियंत्रित**

जिल्ह्यातील धार्मिक स्थळे, रुग्णालये किंवा शैक्षणिक संस्था व सार्वजनिक ठिकाणाच्या जवळपास तात्पुरती पक्ष कार्यालये स्थापीत करता येणार नाही. वरील आदेश नांदेड जिल्ह्यासाठी निर्गमीत झाल्याच्या तारखेपासून दिनांक २७ नोव्हेंबर पर्यंत अंमलात राहतील.

**मतदान केंद्र परिसरात कलम लागू**

ज्याठिकाणी मतदान केंद्रावर मतदान होणार आहे. त्याठिकाणापासून २०० मीटर परिसरात पक्षकारांना मंडपे उभारण्यास, दुकाने चालू ठेवण्यास व मोबाईल, कॉडलेस फोन, पेजर, वायरलेस सेट, ध्वनीक्षेपके, इतर इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे यांचा वापर करण्यास, संबंधीत पक्षांच्या चिन्हांचे प्रदर्शन करण्यास तसेच सर्व प्रकारचे फेरीवाले, निवडणुकीच्या कामाव्यतीरीक्त खाजगी वाहन व निवडणूकीच्या कामाव्यतीरीक्त इतर व्यक्तीस प्रवेश करण्यास याद्वारे प्रतिबंध करण्यात आले आहे.

**भाषण विनापरवानगी नाही**

संबंधीत पक्षांचे चित्रे, चिन्हांचे कापडी फलके, सार्वजनिक ठिकाणी भाषण देणे यावर याद्वारे निर्बंध घालण्यात आले आहेत. तसेच शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक मालमत्तेची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरुपात विरुपता करण्यास याद्वारे निर्बंध घालण्यात आले आहे.

**नामनिर्देशनपत्र कार्यपद्धत**

नामनिर्देशनपत्र दाखल करते वेळी कार्यालयाच्या परिसरात मिरवणूक, सभा घेणे, कोणत्याही प्रकारच्या घोषणा देणे, वाद्य वाजवणे किंवा गाणी म्हणने आणि कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करणेस, तसेच वाहनाच्या ताफ्यामध्ये ३ पेक्षा जास्त वाहने निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयाच्या १०० मिटरचे परिसरात आणणेस, तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या दालनात नामनिर्देशनपत्र दाखल करण्यासाठी पाच व्यक्ती पेक्षा जास्त व्यक्तींना उपस्थित राहण्यास प्रतिबंध करण्यात आले आहे.

**मतमोजणी केंद्र परिसरात प्रतिबंध**

मतमोजणीची प्रक्रिया ही ज्या मतमोजणी केंद्रावर होणार आहे, त्या ठिकाणापासून २०० मीटर परिसरामध्ये मोबाईल, कॉडलेस फोन, पेजर, वायरलेस सेट, ध्वनीक्षेपके, व इतर इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे यांच्या वापरास व मतमोजणीच्या कामाव्यतीरीक्त इतर व्यक्तीस प्रवेश करण्याकरीता प्रतिबंध करण्यात आले आहे. आदेश २३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजनी सुरु




झाल्यापासुन मतमोजणीचा कार्यक्रम पुर्ण होईपर्यंत अंमलात राहील.

**शस्त्रास्त्रे बाळगण्यास बंदी**

शासकीय कर्तव्य पार पाडणाऱ्या व्यक्ती, दंडाधिकारी शक्ती प्रदान केलेले अधिकारी, पोलीस अधिकारी, कर्मचारी, बँकेच्या सुरक्षा व्यवस्थेवरील अधिकारी व महाराष्ट्र शासन गृह विभाग यांचे दिनांक २० सप्टेंबर २०१४ च्या मार्गदर्शक सूचनानूसार जिल्हयातील छाननी समितीने वगळलेल्या शस्त्र परवानाधारका व्यतीरीक्त इतर सर्व परवाना धारक व्यक्तींना परवाना दिलेली शस्त्रास्त्रे वाहून नेण्यावर व शस्त्र बाळगण्यास या आदेशान्वये प्रतिबंध करण्यात अर्थात बंदी घालण्यात आले आहे.

**जिल्हाधिकारी कार्यालयापुढे गर्दी नको**

निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय (जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड) येथे नामनिर्देशनपत्र दाखल करतेवेळी सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत केवळ नामनिर्देशनपत्र दाखल करण्यासाठी येणा-या उमेदवारांच्या वाहनाच्या ताफ्यामध्ये तीन वाहने व शासकीय कर्तव्य पार पाडणारे शासकीय कर्मचारी, अधिकारी यांचे वाहने वगळता इतर सर्व वाहनास सदर रस्त्यावरुन वाहतुकीस याद्वारे प्रतिबंध करण्यात येत आहे.

**परवानगी घेऊन छापा**

इतर उमेदवाराचे नाव व त्यांनी नेमुन देण्यात आलेले चिन्ह वापरणे. नमुना मतपत्रिकेसाठी आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे कागद वापरणे. आयोगाने निश्चित केलेल्या कागदाच्या आकारामध्ये नमुना मतपत्रिका छापणे या प्रमाणे नमुना मतपत्रिका छपाईस निवडणूक प्रक्रीया पूर्ण होईपर्यंत २७ नोव्हेंबर २०२४ पर्यंत निर्बंध घातले आहेत.

**जातीचे मेळावे बंद**

जिल्ह्यात कुठेही कसल्याही प्रकारचे जात, भाषा, धार्मिक शिबीरांचे, मेळाव्यांचे आयोजनावर निवडणूक प्रक्रीया पुर्ण होईपर्यंत २७ नोव्हेंबर पर्यंत निर्बंध घातले आहेत. निवडणूकीचे साहित्य कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी, रस्त्यावर रहदारीस अडथळा होईल किंवा अपघात होईल अशा पध्दतीने लावण्यास निवडणूक प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत निर्बंध घातले आहेत. निवडणूकीचे प्रचारासाठी कोणत्याही व्यक्तीगत जागा, ईमारत, आवार, भिंत ईत्यादीचा संबंधीत जागा मालकाचे परवानगी शिवाय व संबंधीत परवाना देणाऱ्या प्राधिकरणाच्या परवानगी शिवाय वापर करण्यास निवडणूक प्रक्रीया पुर्ण होईपर्यंत निर्बंध घातले आहेत.

**परवानगी शिवाय झेंडा नको**

फिरत्या वाहनांवर पक्ष प्रचाराचा झेंडा हा जिल्हाध्यक्ष उमेदवार व उमेदवाराचे निवडणूक प्रतिनिधी निवडणूक प्रचारासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडून अधिकृत परवानगी घेतलेल्या वाहनाव्यतिरिक्त इतर कोणत्याही वाहनांवर लावता येणार नाही. हे आदेश निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत २७ नोव्हेंबर पर्यंत अंमलात राहतील.

**ध्वनीक्षेपकाच्या वापरावर निर्बंध**

ध्वनीक्षेपकाचा वापर पोलीस अधिकारी यांचे परवानगी शिवाय करता येणार नाही. सकाळी ६ वाजण्यापुर्वी आणि रात्री १० वाजेनंतर कोणत्याही फिरत्या वाहनावर व कोणत्याही क्षेत्रात ध्वनीक्षेपकाचा वापर करता येणार नाही. दिवसा प्रचाराकरिता फिरणाऱ्या वाहनांनी ध्वनीक्षेपकाचा वापर विशिष्ट ठिकाणी थांबुनच करावा. ध्वनी क्षेपकाच्या आवाजासह फिरणाऱ्या वाहनास प्रतिबंध असेल. सर्व राजकीय पक्ष आणि उमेदवार आणि ईतर व्यक्तींनी निश्चीत ठिकाणी ध्वनी क्षेपकाच्या वापरा संबंधीत घेतलेल्या परवानगीची माहीती जिल्हादंडाधिकारी, संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी व संबंधीत यंत्रणेस कळविणे बंधनकारक राहील. हे आदेश निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत २७ नोव्हेंबर २०२४ पर्यंत) अंमलात राहतील. प्रत्येक ईसमावर हे आदेश तामील करणे शक्य नसल्यामुळे हे एकतर्फी आदेश ध्वनीक्षेपकावर पोलीस विभागाने जाहीर करुन त्यास प्रसिद्धी करावी असेही आदेशात स्पष्ट केले आहे.

# सिंदखेडराजा येथे विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिस कर्मचाऱ्यांची बैठक

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

विधानसभा निवडणूक २०२४ च्या पार्श्वभूमीवर सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघातील पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांची आज दि. १६ ऑक्टोबर २०२४ रोजी मा. उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी सिंदखेड राजा प्रा.संजय खडसे यांच्या अध्यक्षतेखाली दि. १६ आक्टोबर रोजी बैठक पार पडली.

बैठकीमध्ये प्रा. खडसे यांनी विधानसभा निवडणुकीच्या सर्व बाबींचा आढावा बैठकीमध्ये घेतला. पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांनी आपापली जबाबदारी योग्यरीत्या पार पाडून, विधानसभा निवडणुकीला प्राधान्य देऊन प्रक्रिया पूर्ण करावी यासाठी मार्गदर्शन केले.

प्रा. खडसे यांनी आचारसंहितेचे पालन करताना कोण कोणत्या गोष्टींची काळजी घ्यायची याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले, निवडणुकीतील कर्मचारी / अधिकाऱ्यांकडून कोणतीही चूक होऊ नये याची दक्षता घेण्याचे सुद्धा सर्वांना आवाहन केले.



मतदान अर्ज भरण्यापासून ते मतदान मोजणी पर्यंत पोलीस विभागाची भूमिका ही खूप महत्वाची आणि जबाबदारीची असते याबद्दल सांगण्यात आले. नामनिर्देशन करतेवेळी, अर्ज माघे घेतेवेळी, सभा, मोर्चे, प्रचार करताना पोलीस अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांनी सतर्क राहून आपली जबाबदारी पार पाडावी असे आवाहन प्रा. खडसे यांनी केले.स्थिर सर्वेक्षण पथक (SST ) हे दिनांक २२ ऑक्टोबर पासून कार्यान्वित होणार असून २४ तास हे पथक काम करेल. गाडीची तपासणी करणे, संशयास्पद वस्तू आढळल्यास त्या जप्त करणे इत्यादी कामे हे पथक करत असते. सिंदखेड राजा आणि देऊळगाव राजा तालुक्यासाठी प्रत्येकी २ असे एकूण ४ फिरते पथक (FST ) स्थापन केले आहेत अशी माहिती प्रा. खडसे यांनी दिली. बॅनर, झेंडे लावण्या संबंधिच्या परवानग्या आवश्यक असतील तसेच शस्त्र वापरासंबंधीच्या सूचना देण्यात आल्या.

आजच्या या सभेला वरिष्ठ पोलीस निरीक्षक देऊळगावराजा श्री. संतोष महल्ले, API सिंदखेड राजा श्री. तुषार जाधव, API किनगावराजा श्री. विनोद नरवाडे, API आंढेरा श्री विकास पाटील, झडख सिंदखेड राजा श्री. बालाजी सानप, झडख डऊझज कार्यालय देऊळगाव राजा श्री. विश्वनाथ राठोड तसेच इतर पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

# दुसरबीड येथे एकाच रात्री दोन दुकाने फोडून २ लाख ४० हजाराचा माल लंपास

## मोटार पंप चोरणारी टोळी सक्रिय



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

सिंदखेडराजा तालुक्यातील दुसरबीड येथील महामार्गालगत असलेली दोन इलेक्ट्रिकल दुकाने फोडून २ लाख ४० हजारांचा मुद्देमाल चोरट्याने लंपास केल्याची घटना दि.१४ ऑक्टोबरच्या मध्यरात्रीनंतर घडली.

याबाबत सविस्तर असे की, किनगावराजा पोलीस स्टेशन अंतर्गत असलेल्या पोलीस मदत केंद्रापासून हाकेच्या अंतरावरच मोटार रिवाइंडींग व हातपंपाचे विक्री करणारी दोन दुकानांचे कुलूप तोडून ७.५ एचपी च्या ४ इलेक्ट्रीक पंप, ३ एचपी चे ३, ५ एचपीचा १, मर्सिबल पंप १.५एचपी, ३ इलेक्ट्रीक मोटार, पाईप, केबल बंडल तसेच दुसऱ्या दुकानातील ५ एचपी शेतकऱ्यांच्या ४ मोटारी व भंगारातील तांब्याची तार असा एकुण जगदंबा मशिनरी व गुरुकृपा मोटर रिवायडींग या दोन दुकानातील २ लाख ४० हजाराचा माल लंपास अज्ञात चोरट्यांनी पसार केला.

सिंदखेडराजा ते मेहकर महामार्गावर रात्रीबेरात्री वाहतूकीची वर्दळ सुरू असते. यासोबतच किनगावराजा पोलीसांकडूनही पेट्रोलिंग व आवाजवी सुरू असताना पोलीस मदत केंद्रापासून हाकेच्या अंतरावर असलेली दुकाने फोडण्याचे धाडस चोरट्यांनी केले. दुकाने फोडल्याची माहिती मिळाल्यानंतर श्वानपथक किनगाव राजा पोलिसांचा ताफा घटनास्थळी हजर झाला होता किनगाव राजा पोलिस स्टेशनचे ठाणेदार विनोद नरवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकाँ गणेश डोईफोडे करत आहे

## सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्ष व संचालकांना संस्थेच्या निधीतून लाभ घेता येत नाही

# हे जेवढे खरे तेवढेच लाभ घेणाऱ्या कर्जदारांना सुध्दा परतफेडीचे भान असणे गरजेचे-डॉ.विजयकुमार कस्तुरे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**शेगाव । ज्ञानेश्वर बुधवत**

नुकत्याच स्थानिक श्री समृद्धी महिला सहकारी पतसंस्था म. शेगावच्या वतीने आयोजित बारावा वर्धापनदिन तथा नूतन वास्तूमध्ये स्थानांतरण सोहळ्याच्या, मा. देवाभाऊ हिवराळे - जिल्हाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी यांच्या अध्यक्षतेखाली व मा. अनुजा सावळे - जिल्हाध्यक्षा, राष्ट्रवादी महिला काँग्रेस तथा अध्यक्षा, राष्ट्रमाता जिजाऊ महिला अर्बन यांच्या मार्गदर्शनाखाली आणि बुलढाणा चे माजी आमदार तथा भा. ज. प. नेते मा. विजयराज शिंदे यांच्या हस्ते उदघाटन होऊन, विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झालेल्या दि. ०७-१०-२०२४ रोजीच्या भव्यदिव्य सोहळ्यात, प्रमुख अतिथी व वक्ता या नात्याने बोलत असताना ज्येष्ठ साहित्यिक कवी तथा हरहुन्नरी कलावंत तसेच सामाजिक क्षेत्रातील समर्पित सेवा कार्यास्तव अमेरिकन विद्यापीठातर्फे मानद डॉक्टरेट प्राप्त ज्येष्ठ




विधिज्ञ डॉ. विजयकुमार कस्तुरे, चिखली यांनी वरील प्रमाणे उदगार काढून अशा सहकारी संस्थांमधून कल्याणकारी उद्दिष्टांच्या अंतर्गत वाटप करण्यात आलेल्या कर्जांच्या परतफेडीची कायदेशीर जबाबदारी कर्जदार जनतेने सुध्दा आद्य कर्तव्य समजून पार पाडली पाहिजे, तरच सहकारी संस्था आपले सेवाकार्य चांगल्या पद्धतीने करू शकतील अशी कडक समजही लाभधारकांना दिली.

याप्रसंगी संचालक तथा या सुंदर समारंभाच्या यशस्वी नियोजनात आपल्या समर्थ सूत्रसंचालनाने मोलाची भर टाकणारे तथा ज्येष्ठ संपादक प्रा. भास्करराव इंगळे, बुलढाणा तसेच मा. अनुजाताई व मा. विजयराज शिंदे सह इतरही मान्यवरांनी प्रबोधनात्मक मार्गदर्शन केले. या सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ समाजसेवक म्हणून तसेच समर्थ कथाकार म्हणून सातासमुद्रापारच्या विद्यापीठाची मानद डॉक्टरेट प्राप्त ज्येष्ठ कवी तथा साहित्यिक अनुक्रमे डॉ. डी. व्ही. खरात, चिखली व डॉ. बबनराव महामुने, हिवरा आश्रम यांच्या सह सामाजिक कार्यकर्ते अंकुश पडघान, बोरगाव काकडे, इ. सह अनेक उद्योजक, व्यापारी, शैक्षणिक, सामाजिक, राजकीय तसेच विविध क्षेत्रातील महिला-पुरूष पदाधिकारी तथा मान्यवरांची उपस्थिती होती.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्था अध्यक्ष तसेच संचालक मंडळ, व्यवस्थापन वृंद आणि विशेषेकरून तोरणवाड्याच्या माऊली बहुउद्देशीय शिक्षणसंस्थेचे अध्यक्ष मा. संजय पाटील यांनी अथक परिश्रम घेतले तसेच मा. पाटील यांच्या सह इतरही काही मान्यवरांनी या शुभप्रसंगी लक्षावधी रूपयांच्या ठेवी संस्थत ठेवून आगळा वेगळा आदर्श घडविला.

## आष्टी येथे राज्यस्तरीय काव्य संमेलन ज्येष्ठ कवी लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न

# १४ कविरत्न व पत्रकार रत्न पुरस्कार ह.भ.प.दानवे महाराज,ह.भ.प.खलाशे महाराज,डॉ.विलास सोनवणे,सरपंच शालनताई मुळे यांच्या हस्ते वितरण



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | अण्णासाहेब साबळे**

बीड जिल्हातील आष्टी येथील श्री जगद्गुरू संत तुकाराम महाराज मंदिर सेवा समिती,वसंतनगर भव्य राज्यस्तरीय काव्य संमेलन शुक्रवार दि.११/१०/२०२४ रोजी दुपारी ११.०० ते ३.०० या वेळेत मोठ्या उत्साहात पार पडले.यावेळी उपस्थित अनेक कवींनी आपल्या कविता सादर केल्या.संजय शेळके 'नवरात्र व भेसळ',मुकुंद लगड श्री शक्तीचा महिमा,'बळीराजा',बाबासाहेब घोरपडे 'नवरात्रीचा गरबा,'जीवन,बाबासाहेब शिकारे 'माझा देश महान',विश्वेश्वर बोडखे कोऱ्या अक्षराचा फळा,सौ लक्ष्मी लांडगे गौर माझी ही सगुणा,जडली प्रीत,गोकुळ गायकवाड कामधेनु,'द्या हो द्या बायको द्या',बाबासाहेब राजगुरू अब्रूचा बाजार,जान्हवी मंडलिक 'पास हो पोरा स्पर्धेच्या युगात','जात्या वरची ओवी',ह.भ.प.आदिनाथ महाराज दानवे 'न दिसणारा बाप','आई',प्रकाश खंडागळे 'भक्तिरस','आडोसा',रंगनाथ राळेभात 'सटवीचे अक्षर',अरे मानवा करू नको माझं माझं, दादासाहेब पठारे पेंटर 'गोधडी' अशा प्रकारेच्या स्वरचित रचना बीड,अहिल्यानगर,सोलापूर व रत्नागिरी या भागातुन आलेल्या स्वरबद्ध केल्या यावेळी श्रोत्यांनी उत्तम प्रकारे दाद देऊन रचनांचा अस्वाद घेतला.राज्यस्तरीय काव्य संमेलन ज्येष्ठ कवी लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली १४ कविरत्न व पत्रकार रत्न पुरस्कार ह.भ.प.दानवे महाराज,ह.भ.प.खलाशे महाराज,डॉ.विलास सोनवणे, सरपंच शालनताई मुळे यांच्या हस्ते वितरण करण्यात आले.

यावेळी डॉ.विलास सोनावणे मनोगत व्यक्त करतांना म्हणाले की मी आज दोन तास कवितेसोबत घालविले आहेत.वेळ कसा गेला समजले नाही.समाजाचे कारूण्य आणि वेदना काव्यातून व्यक्त होतात.ह.भ.प.दानवे महाराज आपल्या मनोगतात म्हणाले,'वेद नाही कळाले तरी चालतील ;पण वेदना कळाव्यात' वेदना कळाल्या की संवेदना जाग्या होतात,संवेदना जाग्या झाल्या की कवितेचा जन्म होतो.खरोखर सर्वंच कवी,कवयित्रीची काव्ये वाखाणण्याजोगी आहेत. कवी संमेलनात मुर्शदपूर सरपंच सौ शालनताई अशोकराव मुळे यांनी भुषविले.यावेळी डॉ जालिंदर वांढरे सरपंच कासारी,अध्यक्ष श्री.महादेव लांडगे,जेष्ठ कवी स्वागताध्यक्ष मा.प्राचार्य घनश्याम खलाशे सर,आदेश निमोणकर ग्रा.पं.सदस्य मुर्शवपुर-कासारी,सौ.किर्तीताई प्रवीण धोंडे,ग्रा.पं.सदस्य मुर्शदपुर-कासारी,सौ.चंद्रकलाताई बापुराव नालकोल,ग्रा.पं.सदस्य मुर्शदपुर-कासारी,सौ. अधिकाताई लोखंडे,माजी सरपंच मुर्शदपुर कासारी, प्रा.अनंतराव हंबर्डे,ड.रमाकांत भोकर,डॉ.विलासराव सोनवणे डॉ.गणेश पिसाळ,सुरेश पवार सर माजी चेअरमन विवेकानंद सह.पतसंस्था,प्रा.इजारे सर,नवनाथ डोके,किसनदादा रासकर सर,प्राचार्य एम.डी.पडोळे,मा.प्रकाश खेडकर,सौ.मुक्ताताई वन्सोडे माजी मुख्याध्यापिका, सौ.कृष्णाबाई धोंडे,सौ.गंगाताई हजारे,मा.गोरक्षनाथ टकले, मा.सुभाष लाळगे साहेब, सौ.शोभाताई वामन फाजगे, सौ.माई रघुनाथ पोकळे, पुरोगामी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष आण्णासाहेब साबळे,पत्रकार,संतोष नागरगोजे पत्रकार शेख समीर आदी उपस्थित होते.यावेळी सुत्रसंचलन कवी विश्वेश्वर बोडखे यांनी केले तर प्रा.इजारे यांनी आभार मानले

# वासुंदे परिसरातील स्टोन क्रशर मालकांनी ७०० ते ८०० कोटी रुपयांच्या रॉयल्टीला लावला चूना-हनुमंत जांबले

## मागील ५ महिन्यापासून माहिती देण्यास महसूल विभागाची टाळाटाळ ?





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पुणे (वृत्तसंस्था)**

जिल्हा खनिकर्म विभागातील अधिकारी जनतेसाठी नोकरी करत असताना शासकीय खुर्चीवर बसून शासकीय पगार घेऊन मात्र स्टोन क्रेशर मालकांसाठी काम करत असल्याचे दिसून येत आहे. दिवसा ढवळ्या करोडो रुपयांची शासनाची फसवणूक करीत आहेत. शासनाची करोडो रुपयाची रॉयल्टी स्टोन क्रशर मालकांनी बुडवली असल्याचा लेखी आरोप सामाजिक कार्यकर्ते हनुमंत जांबले यांनी करूनही खनिकर्म विभाग रॉयल्टी किती भरली व उत्खनन किती झाले यांची जाणीवपूर्वक माहिती देण्यास टाळाटाळ करत आहेत.असा आरोप जांबले यांनी केला आहे.

अधिकारी क्रशर मालकाचं हित जपतात कि शासनाचं असाही सूर दबक्या आवाजात लोकांमध्ये आहे.गेल्या ५ महिन्यापासून तक्रार करून अजून कसलीच कारवाई खनिकर्म विभागाने केली नाही नक्की खनिकर्म विभागाचे क्रशर मालकांचा ऐवढा पुळका,आणि प्रेम उतु का चालले आहे.हा देखील मोठा संशोधनाचा विषय झाला आहे. सलग ५ महिने तक्रार करूनही कसलीच कारवाई खनिकर्म विभाग करत नाहीत,म्हणजेच याचा अर्थ असा होतो की हात ओला तर मैतर भला.

# हेमंत पाटील यांची आमदार विधान परिषदेवर निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव | महादेव हरण**

हिंगोली लोकसभेचे माजी खासदार हेमंत पाटील यांची राज्यपाल नियुक्त विधान परिषदेवर निवड करण्यात आली असून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यासाठी सापटगाव सरपंच वसंतराव अवचार शिवसेना शिंदे गट) सेनगाव शहर प्रमुख मधुकरराव देशमुख उर्फ (बाळू मास्तर ) सेनगाव ता, प्रमुख युवा सेना (शिंदे गट )रामेश्वर राव शिंदे, माजी सरपंच नागोराव फासाटे( सिंनगी नागा )यांनी, हिंगोली लोकसभेचे माजी खासदार हेमंत पाटील यांची राज्यपाल नियुक्ती विधान परिषदेवर निवड झाल्याबद्दल त्यांना पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या,



# शरदचंद्र पवार साहेब (तुतारी) राष्ट्रवादी काँग्रेस तळागाळातील शेतकऱ्यांचा कल तुतारीकडे लोणी जिल्हा परिषद गटातील चित्र

## पक्षाने संधी दिल्यास मा.ना.श्री.साहेबराव दरेकर नाना ही विधानसभा जिंकतील

## डॉ.ईश्वर वाळके महागणेश मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी चे अध्यक्ष यांचे प्रतिपादन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | अण्णासाहेब साबळे**

अनेक जण हे राष्ट्रवादी शरद पवार गटातून अजित पवार गटात आले आहेत.त्यामुळे अनेकांच्या मनात शरद पवार यांच्याविषयी लोणी जिल्हा परिषद गटात सहानुभूती असल्याने श्री.साहेबराव दरेकर नाना यांच्या दौऱ्याला लोकांचा चांगला प्रतिसाद मिळत असून आष्टी पाटोदा शिरूर मतदारसंघाचे अनेक तरुण ; शेतकरी नानांकडे आशेचा किरण म्हणून पाहात आहेत.आदरणीय नानांच्या ग्रामीण भागातील दौऱ्याला गर्दी होत आहे.नानांना नक्कीच तिकीट मिळणार या आशेवर संपूर्ण लोणी जिल्हा परिषद गट नानांकडे विधानसभेसाठी सज्ज आमदार म्हणून पाहत आहे. क्षेत्रफळ व मतदानाच्या दृष्टीने बीड जिल्ह्यातील सर्वात मोठा मतदार संघ हा आष्टी,पाटोदा शिरूर आहे या मतदारसंघात तीन तालुक्यांचा समावेश होतो. या मतदार संघाचा बहुतांश भाग हा नगर जिल्ह्याला लागून आहे.या ठिकाणी आपल्या सडेतोड व स्पष्ट भूमिकेत ठाम असणारे लोकप्रिय सर्वांचे लाडके नेतृत्व मा.श्री.साहेबराव दरेकर नाना यांचा प्रभाव जास्त आहे त्यामुळे साहेबराव दरेकर नाना यांना मानणारा वर्ग या ठिकाणी जास्त असून साहेबराव दरेकर नाना यांना पक्षाने जर संधी दिली तर ते निश्चितपणे सोन करतील. अशी त्यांच्या कार्यकर्त्यांना अशा अपेक्षा आहे.या गटामध्ये साहेबराव दरेकर नाना निश्चित आमदार होतील या चर्चा जोरदार प्रमाणात पहावयास मिळत आहेत.साहेबराव दरेकर नाना यांचा या गटांमध्ये चांगला संपर्क आहे गावची लोकसंख्या किती यापासून गावचे संपूर्ण माहिती ही दरेकर नाना यांना असते प्रत्येकाच्या सुख-दुःखात नाना उपस्थित असतात सार्वजनिक कार्यक्रमात नानांचा सहभाग असतो गावातील सप्ताह जत्रा यांना देखील त्यांची आवर्जून उपस्थिती असते नाना जनसंपर्कावर जास्त प्रमाणात भर देतात त्यामुळे नानांना जर पक्षाने संधी दिली तर त्या उपकाराची परतफेड मतदानाच्या रूपामध्ये लोणी जिल्हा परिषद गट केल्याशिवाय राहणार नाही अशा संपूर्ण लोणी जिल्हा परिषद गटाला आहे त्यामुळे साहेबराव दरेकर नाना हे निश्चित आमदार होतील यामध्ये मात्र शंका नाही असे महागणेश मल्टीस्टेट चे संचालक डॉ.श्री.ईश्वर वाळके यांनी सांगितले





# वाचन प्रेरणा दिनानिमित्त कागणे कोचिंग क्लासेसच्या वतिने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार | धोंडीबा मुंडे**

डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे जीवन हे एक प्रेरणादायी आहे.त्यांच्या जिद्द,कष्ट,आणि समाजाच्या प्रति असलेल्या प्रेमामुळे त्यांनी भारतीय तरुणांच्या मनात एक विशेष स्थान मिळवले आहे.जर तुम्हाला यश मिळवायचे असेल तर तुमच्या स्वप्नांचा पाठलाग करा,सतत शिकत राहा आणि कठोर परिश्रम करा. त्यांचे विचार आणि कार्य प्रत्येक विद्यार्थ्याला,नागरिकाला आणि देशप्रेमीला पुढे जाण्याची प्रेरणा देतात अशी त्याची दूरदृष्टी होती.

दि.१५ ऑक्टोबर हा डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस आपल्या देशात आपण वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करतो. वाचन हे ज्ञानार्जनाचे एक साधन आहे. तसेच वाचन ही जीवनभर पुरणारी शिदोरी आहे. अशा या वाचनाचे महत्त्व सांगणारा 'वाचन प्रेरणा दिन' कागणे कोचिंग क्लासेस मध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून मंगळवारी राष्ट्रीय स्तरावरील शालेय विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या एन.एम.एन.एस परिक्षेत पात्र झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला सोबत श्रेया इंटेलिजेंट या परीक्षेतील विद्यार्थ्यांचा ट्रॉफी ,मेडल ,प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला.श्री गणेश उत्सवानिमित्त घेण्यात आलेल्या केसिसी टॅलेंट सर्च परीक्षा (एम सी क्यू) परीक्षेचा निकाल जाहीर करून गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्यात आले.





यावेळी डॉ.ज्ञानेश्वर केंद्रे, योगेश मुंडे,भगवानराव कंधारे यांच्या हस्ते डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमास सुरुवात झाली कागणे कोचिंग क्लासेस मार्फत मान्यवरांचा सन्मान करण्यात आला,राष्ट्रीय स्तरावरील एन.एम.एन.एस परिक्षेत पात्र गुणवंत विद्यार्थी - रोहन मुसळे,मानसी बिजले ,प्रवीण केंद्रे,हाजी शेख,करण गुट्टे, कांचन मुंडे यांचा सत्कार करण्यात आला.तसेच श्रेया इंटेलिजेंट या परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी - रोहन मुसळे,ओमकार बंदुके,मानसी बिजले,शेख हाजी,केंद्रे प्रवीण,वाघमारे मनोज, मुंडे ममता,समर्थ केंद्रे,मुंडे विष्णू, शिंदे जिज्ञेश,पवळे सृष्टी,भागवत मुसळे,स्नेहल गीते,युवराज कागणे,साईराज जायभाये, तंन्जा शेख,बसवंते ऋषिकेश,स्वाती कंधारे यांचा सत्कार करण्यात आला.

आपल्या प्रभावी वक्तृत्वातून योगेश मुंडे यांनी विद्यार्थांना स्पर्धा परिक्षेविषयी सखोल असे मार्गदर्शन केले . तर डॉ,ज्ञानेश्वर केंद्रे व भगवान कंधारे यांनी विद्यार्थांना मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांनी वाचनाचे मानवी जीवनातील महत्त्व पटवून दिले. यावेळी सूत्रसंचालन संतोष कांबळे यांनी केले प्रस्तावना माधव गोटमवाड यांनी केली तर आभार परमेश्वर कागणे यांनी मानले .कार्यक्रम यशस्वीतेसाठी कागणे कोचिंग क्लासेस चे संचालक परमेश्वर कागणे, विकास चव्हाण,बेग,गावंडे, कागणे मॅडम,माधव गोटमवाड,संतोष कांबळे यांनी परिश्रम घेतले.

# मतदारसंघातील सिंचनाचे प्रलंबित प्रश्न निकाली काढणार–आमदार श्यामसुंदर शिंदे

## कंधार येथील १८५ कोटी रुपयांची विविध विकास कामाचे लोकार्पण संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

लोहा–कंधार मतदारसंघाचे आमदार श्यामसुंदर शिंदे यांच्या निधीतून कंधार तालुक्यातील १८५ कोटी रुपये विविध विकास कामाचे उद्घाटन दि.१५ ऑक्टोंबर रोजी करण्यात आले व १०० खाटांच्या भव्य रुग्णालयाचे थाटात लोकार्पणही आमदार शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले,

यावेळी माजी आमदार भाई गुरुनाथराव कुरुडे, सामाजिक कार्यकर्त्या सौ.आशाताई शिंदे,लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विक्रांत दादा शिंदे, सौ.अनुजाताई विक्रांत शिंदे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता सुमित पाटील, वैद्यकीय अधीक्षक डॉ.किशोर कदम, खरेदी विक्री संघाचे उपसभापती श्याम आण्णा पवार, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. उमाकांत बिराजदार,वैद्यकीय अधिकारी महेश पोकळे, डॉ.भगवान जाधव,सरपंच पुंडलिक पाटील बोरगावकर, शेकाप जिल्हाध्यक्ष अवधूत पाटील



शिंदे,राम पाटील गोरे प्रमुख उपस्थित होते.

लोहा व कंधार मतदार संघातील शेतकरी बांधवांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबि करण्यासाठी व मतदारसंघातील मी मंजूर केलेले सर्व सिंचन प्रकल्प आगामी काळात पूर्णत्वास नेणार असून मतदारसंघाला सुजलाम सुफलाम करण्यासाठी मी कटिबद्ध असल्याची ग्वाही यावेळी आमदार शिंदे यांनी बोलताना दिली.शेतकरी बांधवांच्या शेतमालाला योग्य हमीभाव मिळाला पाहिजे यासाठी मी प्रयत्नशील असून, महिला सक्षमीकरण व गोरगरीब शेतकरी कष्टकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेण्यासाठी मी प्रयत्नशील राहणार आहे, मी माझ्या काळात कोणावरही अन्याय केलेला नाही, येणाऱ्या काळात मतदारसंघाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी मी सदैव प्रयत्नशील असल्याची ग्वाही यावेळी आमदार शिंदे यांनी दिली.

यावेळी बोलतांना सामाजिक कार्यकर्त्या सौ.आशाताई शिंदे म्हणाल्या की,आमदार शिंदे यांनी मतदारसंघाचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला असून मतदारसंघात आमदार शिंदे यांच्या पाठपुराव्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा बसवेश्वर, कै. गोपीनाथराव मुंडे यांचे पुतळे उभारले यांचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.आमदार शिंदे यांनी कधीही जातीपातीचे राजकारण केलेले नसून सर्व समावेशक व विकासाचे राजकारण व समाजकारण केल्याचे आशाताई शिंदे म्हणाल्या.

यावेळी शिवाजी केंद्रे,नवनाथ बनसोडे,तालुका अध्यक्ष अवधूत पेठकर,महेश पिनाटे,संचालक गिरीश मामडे,बाळू मंगनाळे,वसंत मंगनाळे आदींनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले तर सूत्रसंचलन विश्वंभर बसवंते यांनी केले.

### आमदार शिंदे यांचा कंधार तालुक्याला सार्थ अभिमान–भाई गुरुनाथ कुरुडे

**आमदार श्यामसुंदर शिंदे यांच्या प्रामाणिक प्रयत्नातून कंधार शहरात ६६ कोटी रुपये कामाचे १०० खाटांच्या भव्य प्रशस्त रुग्णालयाचे शानदार लोकार्पण पूर्ण होत,असल्याचा आम्हा कंधार वासियांना सार्थ अभिमान व गर्व असून १०० खाटांची ही भव्य इमारत ही कंधार शहराची शान आहे, सर्व गोरगरीब रुग्णांना दर्जेदार वैद्यकीय सुविधा मिळणार असून सर्व कंधारवासीय सदैव आमदार श्यामसुंदर शिंदे यांचे ऋणी आहेत,गोरगरिबांचे आरोग्य अबाधीत ठेवण्यासाठी आमदार श्यामसुंदर शिंदे यांचे हे सामाजिक कार्य अलौकिक असून मी आमदार शिंदे यांचे जाहीर अभिनंदन व आभार मानत असल्याचे अध्यक्षीय समारोप करताना माजी आमदार भाई गुरुनाथराव कुरुडे यांनी सांगितले.**

# दैववादाकडून ध्येयवादाकडे केलेला प्रवास परिस्पर्श कादंबरीत रेखाटला आहे–प्रा.डॉ विलास चव्हाण



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

बालपण,तारुण्य, वैवाहिक जीवन,सेवानिवृत्तीनंतरचे जीवन रेखाटताना वैभवशाली दाम्पत्याचा जीवन प्रवास,साथ संगत त्यातून या उभयतांचा एकमेकांना झालेला परिस स्पर्श मांडताना समाज संवर्धनासाठी या दांपत्याचे पावित्र्य चारित्र्यातून प्रेरणा घेतली जाईल, लिखाणाची गती एकसारखी आहे, शेवटपर्यंत क्षणाक्षणाला ही कादंबरी उत्कंठा वाढवणारी आहे असे मौल्यवान प्रतिपादन ज्ञानसिंधू प्रकाशन, साहेबराव नंदन लिखित परिसस्पर्श कादंबरीचा प्रकाशन सोहळा दाजी साठे मे. इं. मि.. स्कूल पिंपळनेर येथे संपन्न झाला.याप्रसंगी डॉ.विलास चव्हाण बोलत होते.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी पालेशा महाविद्यालयाचे से.नि.प्राचार्य डॉ.विलास चव्हाण,एड.संभाजीराव पगारे,सौ.पुष्पलता पगारे, प्रमुख अतिथी विजयकुमार मिठे,कवी जगदीश देवपूरकर,प्रकाशक तानाजी खोडे,कवी प्रकाश पाटील, कीर्तनकार ह.भ.प.रामचंद्र नंदन,ह.भ.प. विजय महाराज काळे, पत्रकार राजेंद्र गवळी, जि.प.कृषी सभापती हर्षवर्धन दहिते, अ.भा.मा.म.चे अध्यक्ष विलासराव पाटील,संस्थेचे उपाध्यक्ष स्वप्निल पगारे, डॉ.राजेंद्र पगारे,मा.उपसरपंच डॉ.विनोद कोठावदे,योगेश भाऊ नेरकर, भाजपा जि.उ.प्रदीप कोठावदे, वसंतराव बच्छाव,प्रमोद गांगुर्डे,से.नि.उपप्राचार्य डी.झेड, पाटील, प्रा.डी.टी. पाटील ,से.प्रा.एस.डी.पाटील,देवेंद्र गांगुर्डे, सतीश पाटील,विजय नंदन, केदा जाधव,पांडुरंग सूर्यवंशी ,जयदयाचे अध्यक्ष अनिल शिंदे, निर्णय सागर सोनवणे,नितीन वरंदळ, मिलिंद महाजन,प्राचार्य सौ. इंद्रायणी वरंदळ,आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजेंद्र गवळी यांनी सूत्रसंचालन प्रा.सौ.सविता पगारे यांनी केले.या परिसस्पर्श कादंबरी प्रकाशन प्रसंगी मान्यवरांनी संस्कार मूल्याची रुजवात करणारी, ११२ पानात ६० वर्षाचा जीवनपट मांडण्याचा केलेला प्रयत्न, लोक परंपरा जपण्याचा व सौ.पुष्पलता ताईंच्या आई–वडिलांचे सुरुवातीचे कष्टमय जीवन आणि नंतर त्यांचं जगणं कसं सुंदर कस झालं ते मांडले आहे,आठवणीच्या हिंदोळ्यावर ही कादंबरी शोभून दिसते, यात नायिकेचे बालपण तरुणपण व निवृत्तीपर्यंतचे जीवन तीन अंकी नाटका समान सांगितले आहे.नीतीचा पाया तिथे कशाची भीती गं हे बापू या नायिकेला सांगतात, हे उभयंता काचेचे भांडे समान मुलींचा सांभाळ करतात, त्यांचं चारित्र्य, पावित्र्य जपतात, म्हणून हे उभयंता फुले दांपत्यासारखे समाजाचे आयडॉल वाटतात. या कादंबरीतील नायिका स्वयंपाकातही सुग्रण आहेत, या दांपत्याच्या जीवनाला सोनेरी किनार आहे.कादंबरीची भाषा ओघवती ,परिसस्पर्श हाती घेतल्याबरोबर पुढे काय अशी उत्कंठा वाढवणारी आहे,सरस्वतीचा वरदहस्त या दांपत्याला लाभला, म्हणून कठीण प्रसंगांना हाताळण्याची कसोटी अप्रतिम आहे,आपलं संपूर्ण श्जीवन आकाशाच्या नक्षत्रासारख्या मुलांना समर्पित करणारे प्रेरणेचा झरा हे दांपत्य आहे, असे प्रेरणादायी मनोगत कवी जगदीश देवपूरकर,ह.भ.प.रामचंद्र नंदन महाराज,विजय महाराज काळे,प्रकाश पाटील,विलासराव पाटील, विजयकुमार मिठे, उपप्राचार्य डी.टी.पाटील से.नि.प्राचार्य एस.डी. पाटील यांनी व्यक्त केले. शेवटी परिसस्पर्श कादंबरीच्या नायिका सौ.पुष्पलता पगारे यांनी अश्रूंना वाट मोकळी करून दिली,त्या भावनिक झाल्या,आपण जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर इथपर्यंतचा प्रवास करू शकले. आपल्या कर्तुत्व, दातृत्व, मातृत्व, वकृत्वाची दखल एड.बापूसो. संभाजीराव पगारे यांनी घेतली व त्यांचा परिस्पर्श आपल्याला झाला असे भावनिक मनोगत व्यक्त केले.शेवटी आभार उमेश माळी यांनी मानले.पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी पगारे आश्रम शाळा संकुलातील मुख्याध्यापक मनेष माळी, झेड.एम. गवळी ,एस.बी.मोरे, शेवाळे,जगताप, शिरसागर व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

# कापसेवस्ती शाळेचा दीड महिन्यात चेहरा मोहरा बदलला

## अग्नीपंखचा आपुलकी मिशन उपक्रम



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

श्रीगोंदा = अग्नीपंख फौंडेशनने लोकसहभागातून अवघ्या ४५ दिवसात श्रीगोंदा येथील जिल्हा परिषदेची कापसेवस्ती शाळेचे सुशोभीकरण केले वाचन प्रेरणा दिनाचे दिवशी लोकार्पण करुन मिसाईलमॅन डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांना मानवंदना दिली बदललेली शाळा परिसर पाहुन पाहुण्यांनी समाधान व्यक्त केले. हे लोकार्पण लेखा व वित्त अधिकारी रमेश कासार गटशिक्षणाधिकारी सत्यजित मच्छिंद्र नवनाथ दरेकर नवनाथ खामकर यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी रमेश कासार यांनी शाळेस पाच हजाराची पुस्तके भेट दिली. यावेळी लोकसहभाग देणाऱ्या देगणीदारांचा अग्नीपंखने सन्मान केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुभाष कापसे होते. रमेश कासार म्हणाले कि अग्नीपंख फौंडेशनने लोकसहभागातून कापसेवस्ती रुपच बदलून टाकले हे आपुलकी मिशन अंतर्गत हे काम दिशादर्शक ठरणार आहे.पुढील वर्षी कापसे वस्ती शाळेने मुख्यमंत्री स्वच्छ शाळा सुंदर शाळा मध्ये भाग घ्यावा त्या दृष्टीने इतर त्रुटी दुर करुन घ्याव्यात सत्यजित मच्छिंद्र म्हणाले कि कापसेवस्ती शाळेचे काम निस्वार्थ भावनेने झाले अग्नीपंख फौंडेशनच्या टीमने इतर शाळांसाठी काम करावे. प्रास्ताविक श्रीगोंदा तालुका सायकल असोसिएशनचे अध्यक्ष नवनाथ दरेकर यांनी केले यावेळी अग्नीपंखचे कोषाध्यक्ष प्रा संजय लाकूडझोडे नवनाथ खामकर रमेश लाढाणे निळकंठ बोरुडे सिताराम भुजबळ रमेश पाटोळे सुनीता बोरुडे दादासाहेब देशमुख दादासाहेब कोल्हे यांची भाषणे झाली. फोटो मेलवर यावेळी प्राचार्य बी टी मखरे डॉ अशोक खेंडके सुनीता वाजे वैशाली कापसे गोपाळराव डांगे महादू उदार जनार्दन घोडेकर मिठू लंके अनंत दळवी एकनाथ अंभोरे संदीप खेतमाळीस शरद तरटे सुभाष रसाळ सुधीर तरटे आप्पा खामकर राजेंद्र राऊत उपस्थित होते. आभार राजकुमार इथापे यांनी मानले सुत्रसंचलन विशाल चव्हाण यांनी केले.झालेला बदल मुले व मुली स्वच्छता गृह दुरुस्ती वालकंपाऊड पेव्हींग ब्लाक हॅण्ड वाशी स्टेशन परस बाग राष्ट्रीय प्रतिके ध्वज स्तंभ खेळाडूंचे फोटो विद्युत रोषणाई मेन प्रवेशद्वार चप्पल स्टॅण्ड वृक्षारोपण .

# विजय रणखांब यांचा कोल्हापूरात राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्काराने सन्मान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**



मागील अनेक वर्षांपासून समाजकार्यात झोकून दिलेले बहुजन शक्ती सेनेचे संस्थापक अध्यक्ष ,वीज कर्मचारी संघटना, लसाकम , राज्य गुणवंत कामगार असोसिएशन व वीज कामगारांच्या हितासाठी लढा देणारे आणि सामाजिक, कर्मचारी संघटना व विविध क्षेत्रात काम करणारे नांदेड जिल्हा लसाकमचे जिल्हाध्यक्ष विजय रणखांब यांनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरी बदल त्यांच्या कार्याची दखल घेऊन राज्य गुणवंत कामगार असोसिएशन महाराष्ट्र व जागृत नागरिक सेवा संस्था कोल्हापूर च्या वतीने राज्यस्तरीय २०२४ चा समाज भूषण पुरस्कार राज्य गुणवंत कामगार असोसिएशनचे नांदेड जिल्हा सचिव विजय रणखांब यांना दिनांक १४ ऑक्टोबर रोजी राजश्री शाहू स्मारक भवन, कोल्हापूर येथे माजी मंत्री तथा विद्यमान आमदार सतेज उर्फ बंटी पाटील विरोधी पक्ष गटनेते विधान परिषद महाराष्ट्र यांच्या शुभहस्ते सन्मानचिन्ह, मानपत्र, शाल श्रीफळ तसेच कोल्हापुरी फेटा देऊन सपत्नीक सन्मानित करण्यात आले. यावेळी मा. रविराज इळवे ,आयुक्त महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, मा. विशाल घोडके सहाय्यक कामगार आयुक्त कोल्हापूर यांची प्रमुख उपस्थिती होती. सामाजिक कार्यात झोकुन देणारे सामाजिक, पत्रकारिता, कामगार क्षेत्रातील अनुभवी अष्टपैलू व्यक्तिमत्व विजय रणखांब यांनी विविध क्षेत्रात केलेले कार्याचा गौरव राज्य स्तरीय समाज भूषण पुरस्कार देऊन करण्यात आला. यावेळी सत्कार ला उत्तर देताना विजय रणखांब यांनी आपण सामाजिक बांधिलकी म्हणून सामाजिक कार्य म्हणजे ही एक सेवा आहे आणि आपण ती सेवा केली पाहिजे. आपण समाजातील जबाबदार असल्याने समाजाप्रती काम करण्याची तळमळ असणे महत्त्वाचे आहे पुरस्कार हे प्रेरणा देतात बळ देतात, ऊर्जा देतात, आणी अजून आपली जबाबदारी वाढली आहे म्हणून समाजातील शोषित पिडीत, वंचितांसाठी कामगारासाठी आपण लढत असल्याने सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे विजय रणखांब यांनी सांगितले. रणखांब यांचे विविध स्तरातून अभिनंदन होत आहे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904